# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 23.01.2026** **वार- शुक्रवार**

---

**<u>पुणेग्रँडटूर’</u>**

या आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेच्या आयोजनासाठी प्रशासनाने उत्कृष्ट नियोजन करत दर्जेदार पायाभूत सुविधा निर्माण केल्या असून, याबाबत केंद्र सरकारसह देश-विदेशातील सायकलपटूंनी समाधान व्यक्त केले आहे. या स्पर्धेमुळे पुणे जिल्ह्याचे नाव जागतिक पातळीवर पोहोचले असल्याचे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. उपमुख्यमंत्री  पवार आणि केंद्रीय क्रीडा आणि युवक कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते ‘पुणे ग्रँड टूर’  च्या अंतिम टप्प्याला म्हाळुंगे-बालेवाडी इथल्या श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलमध्ये सुरुवात करण्यात आली. यावेळी खासदार मेधा कुलकर्णी, आंतरराष्ट्रीय सायकलिंग संघटनेच्या महासंचालक अमिना लानाया, आशियाई सायकलिंग महासंघाचे अध्यक्ष दातो अमरजीत सिंग गिल, अभिनेता अमीर खान, पिंपरी-चिंचवड शहर पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे आदि उपस्थित होते. आगामी ऑलिम्पिक स्पर्धांचे यजमानपद भारताला मिळावे यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रयत्नशील असून राज्यासह देशात अधिकाधिक आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा स्पर्धा आयोजित करण्याचा प्रयत्न राज्य शासन करत राहील असंही पवार यांनी यावेळी सांगितले.‘पुणे ग्रँड टूर’  चे महाराष्ट्र सरकार आणि जिल्हा प्रशासनाने आंतरराष्ट्रीय दर्जाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल अत्यंत आनंद होत असल्याची भावना रक्षा खडसे यांनी यावेळी व्यक्त केली.

**<u>महापौरनिवड</u>**

पुणे महापालिकेसाठी 31 जानेवारी रोजी महापौर आणि उपमहापौर पदासाठी निवडणूक होणार आहे. राज्य शासनातर्फे महापौर निवडणुकीचा कार्यक्रम आज जाहीर करण्यात आला आहे. 27 आणि 28 जानेवारी या दोन्ही दिवशी महापौर उपमहापौर पदांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत देण्यात आली आहे. पुणे महापालिकेत भाजप सर्वात मोठा पक्ष असल्याने 28 तारखेलाच महापौर कोण होणार हे स्पष्ट होणार आहे.

**<u>जायका</u>**

मुळा-मुठा नदी शुद्धीकरणातील  महत्त्वाचा टप्पा समजल्या जाणाऱ्या जायका मैलापाणी शुद्धीकरण प्रकल्पातील तीन मैलापाणी शुद्धीकरण केंद्र  महापालिका प्रशासनाकडून २६ जानेवारीपासून कार्यान्वित केले जाणार आहेत. पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बीपी यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. चार महिन्यांच्या चाचणीनंतर मुंढवा, वडगाव बुद्रुक आणि वारजे इथले  प्रकल्प पूर्ण क्षमतेने चालविले जाणार आहेत. त्यामुळे चार महिन्यानंतर ७४  दशलक्ष लिटर प्रतिदिन मैलापाण्यावर प्रक्रिया होणार असल्याने नदीच्या प्रदूषणामध्ये काही प्रमाणात नियंत्रण येण्याची शक्यता असल्याचं पृथ्वीराज बीपी यावेळी म्हणाले.

**<u>संस्कृतप्रकाशन</u>**

भारतीय तत्त्वज्ञान, विज्ञान, चिंतन आणि जीवनमूल्ये समजून घेण्यासाठी संस्कृत भाषेशिवाय पर्याय नाही. खऱ्या अर्थाने संस्कृतशिवाय भारतीयत्व अथवा हिंदुत्व अपूर्ण आहे, असे मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य भैय्याजी जोशी यांनी व्यक्त केलं आहे. संस्कृत भारती पश्चिम महाराष्ट्र प्रांताच्यावतीने १० संस्कृत पुस्तकांचे लोकार्पण काल पुण्यात करण्यात आलं त्यावेळी ते बोलत होते. संस्कृतमधील कोणतेही तत्त्वज्ञान किंवा सिद्धांत आजपर्यंत अव्यवहार्य ठरला नाही. त्यामुळे भारताच्या उद्धारासाठी सर्वांनी संस्कृत भाषेच्या उत्थानात योगदान द्यावे असं प्रतिपादन राष्ट्रीय संस्कृत

विद्यापीठाचे माजी कुलपती प्राध्यापक वेंपटी कुटुंबशास्त्री यांनी यावेळी केलं. अखिल भारतीय गीता शिक्षण प्रमुख शिरीष भेडसगावकर, डेक्कन महाविद्यालय अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रसाद जोशी आदि मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**<u>परिसंवाद</u>**

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त महाराष्ट्र शासन मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ आणि एमआयटी विश्वशांती विद्यापीठाच्या स्कूल ऑफ एज्युकेशनतर्फे 'मराठी भाषा आणि बोली' या विषयावर उद्या परिसंवाद आयोजित करण्यात आले आहेत. कोथरुड येथील विद्यापीठाच्या ज्ञानेश्वर सभागृहात हा कार्यक्रम होणार आहे. परिसंवादात 'भाषा, बोली आणि आपण' या विषयावर सुशील धसकटे, 'भाषा, बोली आणि वृत्तपत्र' या वर पत्रकार उद्धव धुमाळे, आणि धनंजय भावलेकर हे 'भाषा, बोली आणि चित्रपट' या विषयावर आपले विचार मांडणार आहेत.

**<u>राजानातूकरंडक</u>**

पुण्यातील महाराष्ट्रीय कलोपासकमार्फत आयोजित राजा नातू करंडक आंतरशालेय एकांकिका स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ २९ जानेवारी रोजी भरत नाट्य मंदिर इथं होणार आहे. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण होणार आहे. यावेळी एस.पी.एम.इंग्लिश स्कूलची '८८ आर ए' आणि माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी विद्यालयाची एकांकिका 'जननी जन्मभूमीश्च' यांचं सादरीकरण होणार आहे.

**<u>ससूनरुग्णालयसंशोधन</u>**

पुण्यातील ससून रुग्णालयातील संशोधन जागतिक वैद्यकीय इतिहासात प्रथमच नोंदवले गेले आहे. रुग्णालयातील बालरोग विभागाने नवजात बाळातील तात्पुरत्या मधुमेहाचे जनुक हे आई -वडिलांकडून त्याच्यामध्ये आल्याचे सिद्ध केले आहे. अत्यंत दुर्मिळ आजाराशी संबंधित एका नवीन जनुकीय उत्परिवर्तनाचा जगातील पहिला नोंदवलेला दुवा ससून रुग्णालयातील डॉक्टरांनी शोधून काढला आहे. हे संशोधन 'क्युअर' या आंतरराष्ट्रीय वैद्यकीय नियतकालिकामध्ये प्रसिद्ध झाले आहे.बाळामध्ये सापडलेला मधुमेहाचे जनुक हे प्रौढांच्या जनुकांसोबत जोडलेला असल्याचं दिसून आलं आहे. हे संशोधन नियतकालिकांमध्ये प्रसिद्ध झाले असल्याचं बालरोग विभागाच्या प्रमुख डॉ. आरती किणीकर यांनी सांगितले .

**ई-मोजणी**

ई-मोजणी टप्पा दोन आणि मोजणीसाठीच्या विशेष मोहिमांमुळे पुणे जिल्ह्यासह राज्यभरातील जमीन मोजणीला चांगलाच वेग मिळत आहे. पुणे जिल्ह्यात डिसेंबर महिन्यात तब्बल 3 हजार 421 जमीन मोजणीची प्रकरणे निकाली निघाली असून, या महिन्यातील ही जमीन मोजण्यांमध्ये 181 टक्के वाढ झाली आहे. त्यामुळे प्रलंबित प्रकरणांची संख्या कमी झाली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**